आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाविकास आघाडीचं जागावाटप आज पूर्ण होण्याची शक्यता
- नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून रवींद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर
- विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्तीच्या बैठकीत दीडशे जागांवर एकमत
- रेल्वेचं आगाऊ आरक्षण आता १२० ऐवजी ६० दिवस आधीपर्यंतच करता येणार
- न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघ पहिल्या डावात ४६ धावात गारद, न्यूझीलंडची १३४ धावांची आघाडी

  **आणि**
- १९ वर्ष वयोगटातल्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात छत्रपती संभाजीनगर संघाला तर मुलींमधून मुंबईच्या संघाला विजेतेपद

**<><><><><>**

महाविकास आघाडीचं जागावाटप आज किंवा उद्या जाहीर होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत २१६ जागांवर सहमती झाली आहे, उरलेल्या जागांवर आजच्या बैठकीत सहमती होईल, असं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत पत्रकारपरिषदेत सांगितलं. काँग्रेसच्या ८४ जागांवरच्या उमेदवारांची छाननी झाली आहे. रविवारी केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीनंतर या ८४ किंवा काँग्रेसच्या सर्व जागांवरचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. समाजवादी पक्षाला महाविकास आघाडी काही जागा देणार आहे, असंही ते म्हणाले.

राज्याच्या ८ विभागात महाविकास आघाडीच्या किमान ३ सभा घेण्याची तयारी असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नांदेडचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण त्यांचे वडील होते.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्तीच्या बैठकीत सुमारे दीडशे मतदार संघांवर एकमत झालं आहे. अर्ज भरायला सुरुवात केल्यावर याची विस्तृत माहिती दिली जाईल अशी माहिती, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली. या बैठकीसाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे छत्रपती संभाजीराजे, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य समितीचे शंकर अण्णा धोंडगे, भारतीय जवान किसान पक्षाचे नारायण अंकुशे आणि इतर अनेक समविचारी नेते एकत्रित आले होते. आमचे सरकार एका झेंड्याचे नसेल तर आमच्या डोक्यात तिरंगा असेल, असे बच्चू कडू यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील यांनी आमच्यासोबत यावं अन्यथा स्वतःचे उमेदवार उभे करावेत असं संभाजीराजे म्हणाले.

<><><><><>

‘लाडकी बहीण’ योजनेच्या जाहिरातीवर महायुती सरकारने २०० कोटी रुपयांची उधळपट्टी केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. जनतेच्या कष्टाचा पैसा हे सरकार जाहिरातींवर खर्च करत असल्याचं प्रदेश काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी आज मुंबईत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातल्या ६०० पदाधिकाऱ्यांनी नुकताच सामूहिक राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये संधी न दिल्यामुळे कार्यकर्ते नाराज झाले असून त्यामुळे पुणे शहर पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामा दिल्याचं सांगण्यात येत आहे.

**<><><><><>**

राज्यात होणाऱ्या  विधानसभा निवडणूक प्रचारात काळ्या पैशाचा वापर होत असल्याचं नागरिकांच्या  निदर्शनास आल्यास त्यांनी आयकर विभागाला त्याची माहिती द्यावी असं आवाहन आयकर अधिकाऱ्यांनी केलं आहे. निवडणुकीत वापरला जाणारा काळा पैसा, रोख रकमेची वाहतूक किंवा वाटप, अशा  संशयास्पद गोष्टी नजरेस पडल्यास नागरिकांनी थेट आयकर विभागाच्या टोल फ्री क्रमांकावर किंवा मेल आयडी वर संपर्क करावा अथवा ९४०३३९०९८० या व्हाट्सअप क्रमांकावर विडिओ किंवा छायाचित्र पाठवावं असं आवाहन आयकर विभागाचे नागपुरातील उप आयकर निदेशक अनिल खडसे यांनी केलं आहे. अशी माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गुप्त ठेवण्यात येईल.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभेसाठी निवडणूक लढवणारे उमेदवार आणि त्यांच्या राजकीय पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रसिद्धी करावी लागणार आहे. भारत निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याबाबत सविस्तर निर्देश आणि प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती प्रसिद्ध करण्यासाठी विहीत नमुने देखील दिले आहेत. उमेदवाराविरुद्ध प्रलंबित

गुन्हेगारी खटल्यांची माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर, Know Your Candidate या लिंकवर उपलब्ध असेल.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर राज्यातल्या सर्व जिल्ह्यात निवडणूकपूर्व तयारीला सुरुवात झाली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तपास नाके उभारण्यात आले असून सर्व वाहनांची कसून तपासणी करण्यात येत असल्याची माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची १२० जवानांची तुकडी जिल्ह्यात तैनात करण्यात येणार आहे. तसंच सर्व मतदार केंद्रावर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं.

सांगली जिल्ह्यात निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून प्रशासनाच्या सूचनांचं पालन सर्व राजकीय पक्षांनी करावं असं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. इलेक्ट्रॉनिक माध्यमं, समाजमाध्यमांवर उमेदवारांच्या जाहिराती प्रसारीत करण्याआधी परवानगी घेणं बंधनकारक असल्याचंही त्यांनी सांगितलं.

नवी मुंबईत विनापरवानगी लावलेल्या अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्याची कारवाई महापालिकेने सुरु केली आहे. आचार संहिता लागू झाल्यानंतर महापालिकेने १३ ते १६ ऑक्टोबर या कालावधीत ४ हजार ४१८ अनधिकृत बॅनर्स आणि होर्डिंग्ज काढून टाकले असून सार्वजनिक भिंतीवरची चित्र, लेखन, झेंडे, कमानी देखील हटवण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड- देवळा विधानसभा मतदार संघातले भाजपाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांनी यंदाची विधानसभा निवडणूक न लढविण्याची घोषणा आज पत्रकार परिषदेत केली.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम आजपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. या कार्यक्रमात आज जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

रेल्वे आरक्षणाची १२० दिवसांची मर्यादा आता ६० दिवस होणार आहे. त्यामुळं प्रवास करण्यापूर्वी ६० दिवस आधी तिकिट आरक्षित करता येईल. येत्या १ नोव्हेंबरपासून याची अंमलबजावणी सुरू होणार असल्याचं रेल्वे बोर्डानं कळवलं आहे. सध्या तिकिट आरक्षित केलेल्या नागरिकांना या निर्णयाचा काहीही फटका बसणार नाही. पण नव्यानं आरक्षण करणाऱ्यांना १ नोव्हेंबरपासून केवळ ६० दिवस पर्यंतचीच तिकिट आरक्षित करता येतील. परदेशी प्रवाशांसाठी ही मर्यादा पूर्वीप्रमाणे ३६५ दिवस असेल.

**<><><><><>**

हरित ऊर्जा हा भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या धोरणाचा महत्त्वाचा घटक असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज जागतिक व्यापार केंद्राच्या मुंबई विभागाने आयोजित केलेल्या, 'शाश्वत विकासासाठी हरित आणि नवीकरणीय ऊर्जा' या विषयावरच्या जागतिक व्यापार प्रदर्शनात बोलत होते.

देशातली सर्वाधिक मोठी अर्थव्यवस्था असलेलं महाराष्ट्र राज्य, सौरऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं आणि बायोएनर्जी यासारख्या क्षेत्रांमध्ये देखील आघाडीवर असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

धाराशिव इथं झालेल्या १९ वर्षं वयोगटातल्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात छत्रपती संभाजीनगर संघाने तर मुलींमधून मुंबईच्या संघाने विजेतेपद पटकावलं. दोन्ही गटात लातूरचे संघ उपविजेते ठरले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि धाराशिव जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेच्या वतीने या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

यंदा जून महिन्यात एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेने घेतलेल्या यूजीसी नेट २०२४ परीक्षेचा निकाल उद्या १८ ऑक्टोबर रोजी जाहीर केला जाईल. राष्ट्रीय चाचणी संस्थेने समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

न्यूझीलंड विरुद्ध भारत कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा न्यूझीलंडच्या ३ बाद १८० धावा झाल्या. आता न्यूझीलंडकडे १३४ धावांची आघाडी आहे. भारताच्या कुलदीप यादव, आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी एक गडी टिपला. बेंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर आज झालेल्या या सामन्यात फलंदाजीला उतरलेला भारतीय संघ अवघ्या ४६ धावांमध्ये गारद झाला. कोहलीसह भारताचे पाच फलंदाज शून्यावर बाद झाले. रिषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं

१५ धावात ५ गडी बाद केले. विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ भारतीय खेळाडूंना तंबूत परत पाठवलं. हा या सामन्याचा दुसरा दिवस होता, कालच्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द झाला होता.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.